# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 11/12/2019 (बुधवार)
# (दुपार)

---

## विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :– दि. 09/12/2019 चे 15:00 वा. चे सुमारास 25 वर्षीय पीडित/फिर्यादी ही घरी हजर असता आरोपी नामे– विठ्ठल उमरकर, वय 55 वर्ष, रा. अंबाडा याने तिच्या घरी प्रवेश करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. पीडिता ओरडली असता आरोपीने पळ काढला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि सोनवणे हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 30 कि.मी अंतरावर मौजा गौराळा येथे दिनांक 10/12/2019 चे 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. अनुसया प्राणहंस बावणे, वय 30 वर्षे, रा. गौराळा व आरोपी नामे– 1) संगिता मडावी हे एकाच गावातील व एकमेकांचे घराशेजारी राहणारे असुन जुने वादाच्या कारणावरून आरोपी क्र. 1, 2) दूर्याधन मडावी 3) दादाराव खेडकर 4) गजानन आहाके 5) सविता माहुरकर 6) शालु आहाके 7) नरेंद्र माहुरकर सर्व रा. गौराळा श्यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादींना शिवीगाळ करून हातबुक्याने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,323,504 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक किशोर लोही हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर – दिनांक 08/12/19 चे 18.30 वा. ते 20.00 वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी यांच्या साळीचा मुलगा नामे– सुनिल शालीकराम काटेकर, वय 12 वर्ष यास अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सोनु रामचंद्र विश्वकर्मा, वय 42 वर्ष, रा. खानगाव रोड रेल्वे क्रासिंग जवळ, ता. सावनेर यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक जुनोनकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर